Printed from

महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# नेटवर्किंग : एक जीवनशैली

8 Jul 2011, 0144 hrs IST

SMS NEWS to 58888 for latest updates

कोणताही उद्योग-व्यवसाय, सामाजिक संस्था चालवायची तर त्यासाठी व्यवस्थापनाचे मोठे जाळे विणावे लागते, आधुनिक परिभाषेत सांगायचे तर नेटवकिर्ंग करावे लागते. वेगळ्या प्रकारची, वेगवेगळ्या क्षमतेची, वेगवेगळ्या मनोवृत्तीची माणसे जोडून त्या सगळ्यांकडून एक लक्ष्य गाठायचे असते.

नेटवर्किंगच्या तत्त्वावर आधारित सगळ्या जगात पसरलेली कंपनी म्हणजे अॅमवे. मल्टिपल चेन माकेर्टिंग या पद्धतीचा उपयोग करून अॅमवेने आज जगभरातील लक्षावधी ग्राहकांशी नाते जोडले आहे. उत्पादकाकडून वितरकाकडे, तिथून होलसेलरकडे, तिथून किरकोळ विक्रेत्याकडे असा प्रवास होताना उत्पादनाची किंमत वाढते. शिवाय मधला एखादा दुवा कमकुवत निघाला तरी संपूर्ण विक्रीवर त्याचा परिणाम होतो, त्यापेक्षा उत्पादकाकडून थेट ग्राहकाकडे वस्तू गेली तर ग्राहकाला स्वस्त दरात वस्तू मिळू शकते. यासाठी नेटवकिर्ंगचे तत्त्व वापरून ग्राहकांनाच विक्री करायला उद्युक्त केले आणि अॅमवेचा प्रसार जगभर झाला.

नेटवकिर्ंगचे तत्त्व उद्योग व्यवसाया-प्रमाणेच राजकारण-समाजकारण या क्षेत्रातही अत्यंत उपयोगी ठरते. समर्थ रामदास यांच्या चिंतनात, लेखनात, उपदेशात राजकारणाला विशेष स्थान होते. याचे कारण तत्कालीन सामाजिक-राजकीय परिस्थितीत दडलेले होते. परकीयांच्या जुलमी सत्तेखाली चिरडून निघणाऱ्या समाजाचा विकास होण्यासाठी न्यायी-हितकर अशा देशी सत्तेची, स्वराज्याची स्थापना होणे आवश्यक आहे हे समर्थांनी जाणले होते. म्हणूनच त्यांना राजकारणात रस होता तो सर्वसामान्य जनतेचे भले व्हावे म्हणून. त्यामुळे आपल्या विवेचनात हरिकथा निरुपणाला प्रथम प्राधान्य देणाऱ्या समर्थांनी त्यापाठोपाठ राजकारणाला स्थान दिले आहे. मात्र हे राजकारण कसे असावे तरराजकारण बहुत करावें। परंतु कळोंच नेदावें। परपीडेवर नसावे। अंत:करण।। हे सांगायला ते विसरत नाहीत. इतरांना कळू न देता, इतरांना पीडा न देता राजकारण कसे करायचे हे सांगताना समर्थांनी जी सूत्रे सांगितली आहेत ती उद्योगात आणि वैयक्तिक जीवनातही उपयोगी पडणारी आहेत. लोकीं लोक वाढविले। तेणे अमर्याद झाले। भूमंडळी सत्ता चाले। गुप्तरूपे।।

एका व्यक्तीद्वारे दुसऱ्या व्यक्तीशी जोडता येते, दुसऱ्याने तिसऱ्या व्यक्तीपर्यंत पोहोचता येते आणि ही साखळी वाढत वाढत एक हितसंबंधांचे जाळेच उभे राहाते. अशा प्रकारचे नेटवकिर्ंग हे गाजावाजा किंवा जाहिरात न करता होत असल्याने तुमचे व्यावसायिक वा वैयक्तिक जाळे तुमच्या प्रतिस्पर्ध्याच्या नकळत वाढत जाते. काही वेळा कोणतेही उद्दिष्ट समोर न ठेवता जोडलेले संबंधही अचानक उपयोगी पडू शकतात.

आमच्या निरगुडकर फाऊंडेशनकडून आम्ही कॅन्सर पेशंटपासून ते होतकरू विद्यार्थ्यांपर्यंत अनेक प्रकारच्या गरजू लोकांना होईल ती मदत करतो. एकदा एका व्यक्तीने मदतीसाठी अर्ज केला होता. त्याला फाऊंडेशनकडून योग्य मदत करता आली. काही वर्षांनी माझ्या एका स्नेह्यांच्या गाडीला अपघात झाला होता, त्याबाबत ती केस हाताळणाऱ्या पोलिसाशी मी फोनवरून बोललो, त्याला मी माझे नाव सांगितले, तेव्हा त्याने विचारले की निरगुडकर फाऊंडेशनशी माझा काही संबंध आहे का? तर मी म्हणालो की, मीच त्या फाऊंडेशनचा अध्यक्ष आहे, तसा तो पोलिस म्हणाला, अहो, तुम्ही मला खूप मोठी मदत केली आहे आणि त्याने सगळा संदर्भ सांगितला. त्यानंतर त्याने माझ्या स्नेह्यांना लगेच साहाय्य केले. नेटवकिर्ंग हे असे कधी, कुठे, कसे उपयोगी पडेल सांगता येत नाही. त्यामुळे आयुष्यात माणसं जोडण्याची एकही संधी वाया घालवू नका.

- डॉ. सुधीर निरगुडकर

Network Access Message: The page

Tweet या बातमीला ट्विट करा

**या बातमीवर तुमचं मत मांडण्यासाठी** इथे क्लिक करा.

इतर बातम्यांचे व्हिडिओ पाहण्यासाठी क्लिक करा

Powered by Indiatimes

About Us | Advertise with Us | Terms of Use | Privacy Policy | Feedback | Sitemap

Copyright © 2011 Bennett Coleman & Co. Ltd. All rights reserved. For reprint rights: Times Syndication Service

This site is best viewed with Internet Explorer 6.0 or higher Firefox 2.0 or higher at a minimum screen resolution of 1024x768